बीड (महाराष्ट्र) । सायं.दैनिक । मराठी । वर्ष – ०३ । अंक – २५ । वार शुक्रवार दि २४ ऑक्टोंबर २०२५ आरएनआय एमएचएमएआर /२०२३/८३९६५ । किंमत ३ रू. । पाने ४

Beed (Maharashtra) Daily Evening Marathi n Year - 03 Issue - 25 FRIDAY 24 October 2025 RNI : MAHMAR/2023/83965 Price - 3 Rupees Pages 4

# डॉ. संपदा मुंडेंना न्याय द्या, वडवणीच्या एका प्रामाणिक तरुण महिला डॉक्टरचा फलटणमध्ये जीव गेला!

## डॉ. संपदा मुंडेंचा मृत्यू नव्हे.. ही पोलिसी गुंडशाहीची हत्या आहे



सायं.दैनिक महाराष्ट्र
# आरंभ
● संपादक :– दिपक थोरात



# पीएसआयकडून चार वेळा बलात्कार आणि घरमालकाकडून नऊ महिन्यांपासून छळ; पोलिस प्रशासनाच्या सडलेल्या व्यवस्थेचा बळी ठरली महिला डॉक्टर!

### हातावर लिहिलेल्या सुसाईड नोटमध्ये पीएसआयवर चार वेळा बलात्कार, सतत छळ; डॉ. संपदा मुंडे आत्महत्येने उघड केली पोलिसांतील काळी बाजू, आरोपींना अटक कधी?

बीड, (प्रतिनिधी):– बीड जिल्ह्यातील केज तालुक्यातील कोठरबन येथील रहिवासी आणि सध्या फलटण उपजिल्हा रुग्णालयात कार्यरत असलेल्या वरिष्ठ महिला डॉक्टर डॉ. संपदा मुंडे यांनी एका हॉटेलमध्ये आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना गुरुवारी रात्री उशिरा उघडकीस आली. आत्महत्येपूर्वी डॉक्टरच्या हातावर लिहिलेल्या सुसाईड नोटमध्ये परळीतील पोलीस उपनिरीक्षक गोपाळ बदने याने चार वेळा बलात्कार केल्याचा तसेच घरमालक असलेल्या प्रशांत बनकर या व्यक्तीने मानसिक त्रास दिल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. या घटनेने वैद्यकीय आणि पोलीस प्रशासनात एकच खळबळ उडाली आहे. प्राथमिक माहितीनुसार, गेल्या काही महिन्यांपासून डॉ. मुंडे या पोलीस व आरोग्य विभागातील वादात अडकल्या होत्या. वैद्यकीय तपासणीसंदर्भातील वादानंतर त्यांच्या विरोधात चौकशी सुरू होती.या चौकशी दरम्यान पीएसआय बदने यांनी बलात्कार केल्याचा आरोप डॉक्टर मुंडे यांनी हातावर सुसाईड नोट मध्ये केला आहे. फलटण सिटी पोलिसांनी सुसाईड नोटच्या आधारे भारतीय न्याय संहितेच्या कलम ६४(२)(छ) व १०८ अन्वये गुन्हा नोंदवला आहे. आरोपी झडख गोपाळ बदने (मूळ रा. परळी) हा सध्या फलटण ग्रामीण पोलीस ठाण्यात कार्यरत असून त्याला तत्काळ निलंबित करण्यात आले आहे.झडख बदने व प्रशांत बनकर हे दोघेही फरार असून त्यांच्या अटकेसाठी विशेष पथकाची नेमणूक करण्यात आली आहे.

दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या घटनेची गंभीर दखल घेत आरोपी अधिकाऱ्याच्या निलंबनासह दोषींवर कठोर कारवाईचे आदेश दिले आहेत. राज्य महिला आयोगानेही या घटनेची दखल घेत पोलिसांना सखोल व निष्पक्ष चौकशी करण्याचे निर्देश दिले आहेत. मयत डॉक्टरच्या काकांनी सांगितले की, तिला अनेकदा पोस्टमॉर्टम रिपोर्ट बदलण्यासाठी दबाव आणला जात होता. ती यामुळे अत्यंत मानसिक तणावात होती. तिने यापूर्वीही याबाबत वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे तक्रार केली होती, पण काहीच कारवाई झाली नाही. फलटण येथील एका हॉटेलमध्ये त्यांनी आत्महत्या केली असून पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवला आहे. डॉक्टरच्या हातावर लिहिलेला मजकूर पोलिसांनी महत्त्वाचा पुरावा म्हणून जप्त केला आहे. सातारा जिल्हा पोलीस अधीक्षक तुषार दोशी यांनी सांगितले की, आरोपीविरुद्ध गुन्हा नोंदवला असून त्याचे निलंबन पूर्ण झाले आहे. तपास निष्पक्ष आणि पारदर्शकपणे करण्यात येईल. या घटनेमुळे राज्यभरातून संताप व्यक्त होत असून, महिला डॉक्टरच्या आत्महत्येला जबाबदारांना कठोर शिक्षा व्हावी अशी जनतेतून जोरदार मागणी होत आहे.

### महिला डॉक्टरचा आत्महत्येपूर्वीचा धक्कादायक खुलासा

फलटण शहरात गुरुवारी रात्री उशिरा घडलेल्या घटनेने संपूर्ण राज्य हादरलं आहे. केज तालुक्यातील कोठरबन येथील रहिवासी आणि सध्या फलटण उपजिल्हा रुग्णालयात कार्यरत असलेल्या वरिष्ठ महिला डॉक्टर डॉ. संपदा मुंडे यांनी हॉटेलमध्ये आत्महत्या केली.

पण खरा धक्का बसला तो तिच्या हातावर लिहिलेल्या सुसाईड नोटमुळे त्या नोटमध्ये परळीतील पोलीस उपनिरीक्षक गोपाळ बदने याने चार वेळा बलात्कार केल्याचा तसेच घरमालक प्रशांत बनकर याने मानसिक छळ दिल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. या उघडकीमुळे वैद्यकीय आणि पोलीस विभागात खळबळ उडाली आहे.




### जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर

# राष्ट्रवादी कॉंग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाच्या वतीने बैठकीचे आयोजन

### बीड आणि शिरूर तालुक्यातील सर्व पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी उपस्थित राहण्याचे आ.संदीप क्षीरसागरांनी केले आवाहन

बीड (प्रतिनिधी): आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक २०२५ पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार गट) तर्फे बीड आणि शिरूर तालुक्यातील कार्यकर्ता आणि पदाधिकाऱ्यांची महत्वपूर्ण बैठक आयोजित करण्यात आली आहे.



जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या आरक्षण सोडतीनंतर आ.संदीप क्षीरसागर यांच्या प्रमुख उपस्थितीत पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांची महत्त्वाची बैठक आयोजित करण्यात आली आहे. ही बैठक दि.२४ ऑक्टोबर २०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता राष्ट्रवादी कॉंग्रेस भवन,बार्शी रोड,बीड येथे होणार असून या बैठकीस आमदार संदीप क्षीरसागर, माजी आमदार सय्यद सलीम, जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के आणि अन्य वरिष्ठ पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत. या बैठकीत जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकी संदर्भातील संघटनात्मक तयारी, उमेदवार निवड प्रक्रिया, प्रचार आराखडा आणि पक्ष बळकटीकरण यावर सविस्तर चर्चा होणार आहे. बीड आणि शिरूर तालुक्यातील सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते आणि इच्छुक उमेदवारांना वेळेत उपस्थित राहण्याचे आवाहन जिल्हा राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी (शरद पवार गट) तर्फे आ.संदीप क्षीरसागर यांनी केले आहे.

# संपादकीय...

## ‘ऑपरेशन ब्लू स्टार’ ही चूकच होती; पण कोणाची? इंदिरा गांधींची खरेच होती का...

‘जून १९८४ मध्ये सुवर्णमंदिरात करण्यात आलेले ‘ब्लू स्टार ऑपरेशन’ ही चूक होती आणि ज्यासाठी इंदिरा गांधी यांना आपल्या प्राणाची किंमत द्यावी लागली’ असे उद्गार काँग्रेसचे वरिष्ठ नेते पी. चिदंबरम् यांनी एका पुस्तकाच्या प्रकाशन समारंभप्रसंगी काढले आणि पुन्हा एकदा या विषयाला तोंड फुटले. तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी पंजाबमधील अकाली आंदोलन ज्या पद्धतीने हाताळले, त्यावर अनेक लेख, पुस्तके लिहिली गेली आहेत आणि भविष्यातही लिहिली जातील. जून १९८४ मधील शिखांच्या सर्वोच्च पवित्र ठिकाणी म्हणजे सुवर्ण मंदिरात झालेली लष्करी कारवाई हा या कारवाईचा अंतिम बिंदू होता. या कारवाईला ‘ऑपरेशन ब्लू स्टार’ असे संबोधण्यात आले होते.

इंदिरा गांधींनी हे आंदोलन ज्या पद्धतीने हाताळले, त्यावर बहुतेक लेख आणि पुस्तकांमध्ये टीकाच करण्यात आली आहे. लष्कराला पाचारण करण्यात इंदिराजींनी खूप घाई केली, असे काही जणांचे म्हणणे होते. त्यांच्या मते या समस्येवर इंदिराजींनी चर्चेद्वारे तोडगा काढायला हवा होता. ‘जून १९८४ पूर्वीच असा निर्णय का घेतला नाही?’- म्हणून काही जणांनी टीकाही केलेली आहे. आधी हा निर्णय घेतला असता तर सुवर्ण मंदिरात लपून बसलेल्या अतिरेक्यांना बाहेर काढण्याचे काम पोलिसही करू शकले असते, लष्कराच्या सहभागाची गरजच पडली नसती, असेही अनेकांचे मत दिसते. ही मते-मतांतरे आजवर अनेकदा लिहिली, व्यक्त केली गेली आहेत.

१९८८ मध्ये पोलिसांच्याद्वारे ‘ऑपरेशन ब्लॅक थंडर’ यशस्वीपणे राबविणारे वरिष्ठ पोलिस अधिकारी एस. एस. विर्क, स्व. इंदिरा गांधी यांचे तत्कालीन प्रधान सचिव पी. सी. अलेक्झांडर आणि मेजर जनरल रणजितसिंग दयाल या सर्वांशी माझ्या वेळोवेळी विस्तृत चर्चा झाल्या. त्यात ‘ऑपरेशन ब्लू स्टार’ ही चूकच होती,’ याची कबुली जवळपास सर्वांनीच दिली; पण ‘ती चूक इंदिरा गांधी यांची होती का?’- यावर पी.सी अलेक्झांडर यांचे म्हणणे मला सत्याच्या जास्त जवळ जाणारे वाटते. ते म्हणतात, ‘या घटनेशी निगडित पडद्याआडच्या चर्चा, निर्णयप्रक्रिया आणि धोरणे ठरविण्याची प्रक्रिया यांच्याशी मी संबंधित असल्याने या प्रकरणाबाबत जास्त विश्वासार्ह माहिती कदाचित माझ्याकडे आहे. इंदिरा गांधी यांच्यासमोर गुप्तचर, तसेच विविध यंत्रणांकडून आलेली माहिती आणि लष्करी अधिकाऱ्यांची मते यामुळे दुसरा पर्याय नाही, असे वाटल्याने हा निर्णय घेण्यात आला.’

पी. सी. अलेक्झांडर यांनी याबाबत विस्ताराने त्यांच्या ‘कॉरिडॉर्स ऑफ पॉवर्स’ या आत्मचरित्रात लिहिले आहे. त्यात ते लिहितात, ‘पंजाबची परिस्थिती हळूहळू खराब होऊ लागली आणि त्याला हिंदू विरुद्ध शीख असे धर्मयुद्धाचे स्वरूप येऊ लागले. त्यामुळे इंदिरा गांधी अत्यंत निराश झाल्या होत्या. अकाली आंदोलन हिंसक होऊ लागले, तेव्हा त्या इतक्या निराश होत्या की, त्यांनी वर्ष १९८२ च्या मे महिन्यातील शेवटच्या आठवड्यात पंतप्रधानपदाचा राजीनामा देण्याचा मनोदय माझ्याकडे व्यक्त केला होता. आपण पंतप्रधानपदापासून दूर झालो, तर ते देशाच्या आणि त्यांच्या दृष्टीने योग्य ठरेल, असे त्यांना वाटत होते.’

‘जाब आणि हरियाणा यांच्यामधील राजधानीचा प्रश्न असेल किंवा पाण्याचा; तो शांततेने सुटला पाहिजे, अशी इंदिरा गांधींची प्रामाणिक इच्छा होती. मात्र, विदेशातून पंजाबमधील अस्थिरतेला आणि दहशतवादाला ज्याप्रकारे प्रोत्साहन दिले जात होते त्यामुळे त्यांना काळजी वाटत होती. भिंद्रनवाले सुवर्ण मंदिरात ठाण मांडून बसल्यावर दिल्ली ते पंजाब या भागात हल्ले, हत्या, जाळपोळ आणि हिंसाचार वाढू लागल्या. खलिस्तान निर्मितीची घोषणा होऊ शकते, असा अहवाल गुप्तचर खात्याकडून आल्याने २५ मे १९८४ या दिवशी इंदिरा गांधी यांनी लष्कराला पाचारण करण्याचा निर्णय घेतला. त्यांनी लष्करप्रमुख जनरल अरुण कुमार वैद्य यांना बोलावून घेतले. त्यांनी या अहवालाच्या पार्श्वभूमीवर पंजाबमधील दहशतवाद आणि हिंसाचार प्रभावीपणे निपटून काढण्यास आणि लोकांना सुरक्षितता देण्यास लष्कराने प्राधान्य द्यावे, असे सांगितले. त्याप्रमाणे सुवर्ण मंदिराला वेढा घालणे आणि कमीत कमी बळाचा वापर करून अतिरेक्यांना बाहेर काढणे अशी योजना वरिष्ठ लष्करी अधिकाऱ्यांनी इंदिरा गांधी यांच्यासमोर ठेवली. श्रीमती इंदिरा गांधी या योजनेबद्दल साशंक होत्या. मात्र, सुवर्ण मंदिराचे पावित्र्य राखले जावे, हा त्यांचा आग्रह होता.

- नंतर झालेल्या सुवर्ण मंदिरातील ‘ऑपरेशन ब्लू स्टार’मध्ये लष्कराला आणि देशालाही मोठी किंमत मोजावी लागली. ती इंदिरा गांधी यांनी स्वत:चे प्राण देऊन ती मोजली... मात्र, जे झाले ती खरेच केवळ इंदिरा गांधींची चूक होती का? याची कठोर चिकित्सा व्हायला हवी.

ऑनलाइन लोकमत

‘जून १९८४ मध्ये सुवर्णमंदिरात करण्यात आलेले ‘ब्लू स्टार ऑपरेशन’ ही चूक होती आणि ज्यासाठी इंदिरा गांधी यांना आपल्या प्राणाची किंमत द्यावी लागली’ असे उद्गार काँग्रेसचे वरिष्ठ नेते पी. चिदंबरम् यांनी एका पुस्तकाच्या प्रकाशन समारंभप्रसंगी काढले आणि पुन्हा एकदा या विषयाला तोंड फुटले. तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी पंजाबमधील अकाली आंदोलन ज्या पद्धतीने हाताळले, त्यावर अनेक लेख, पुस्तके लिहिली गेली आहेत आणि भविष्यातही लिहिली जातील.

# पत्रकार - पत्रकार

*सच्च्या व प्रामाणिक पत्रकारांना विचारतंय कोण? ईद असो वा दीपावली त्यांच्यासाठी प्रत्येक दिवस सारखाच मी असं का म्हणतोय ? ते या लेखात थोडक्यात मांडले आहे.*







सध्या सगळीकडे दीपावली मोठ्या धुमधडाक्यात साजरी केली जात आहे. या सणानिमित्ताने इतरांसारखे पत्रकार मंडळींमध्ये सुद्धा आनंदाचे वातावरण आहे. या आनंदाच्या वातावरणाला आता एक दुसरी विकृत म्हणावी अशी किनारही गेल्या काही वर्षापासून लागत आहे. ती म्हणजे, पत्रकार म्हणजे नेमके काय? त्याची पत्रकारिता क्षेत्राविषयी, वृत्तपत्राविषयी आणि समाजाविषयी आपली भूमिका काय हे सुद्धा ज्यांना कळत नाहीये, वृत्तपत्रात बातम्या लिहिणे किंवा लेख लिहिणे तर सोडा ज्यांना बातमीला शीर्षक देण्यासाठी शब्दांच्या दोन ओळी तयार करता येत नाही असे काही बेकार पत्रकार कोणत्यातरी एखाद्या वृत्तपत्राचे प्रतिनिधी किंवा उपसंपादक म्हणून गळ्यात ओळखपत्र अडकवून फिरताना सहज दिसून येतात. मात्र जे खरे पत्रकार आहेत, जे आपल्या पेशाची, लोकशाहीच्या चौथ्या आधारस्तंभाची धुरा अंगाखांद्यावर घेतली म्हणून पोटतिडकीने वृत्तपत्रात लिहितात अशा पत्रकारांना आपली ओळख दाखविण्याकरिता गळ्यात ओळखपत्र अडकवून फिरण्याची गरज पडत नाही. असो!

दीपावलीच्या काळात हा लेख लिहिण्याकरिता यासाठी उद्युक्त झालोय कारण की, यावेळी दीपावली निमित्ताने काही संपादक आणि पत्रकार बांधवांनी अशा तोतया पत्रकारांविषयी आपापल्या वृत्तपत्रातून चांगलीच चिरफाड करत आपापले मनोगत व्यक्त केले आहे. यात काहींनी पत्रकारितेचा मुखवटा घालून दिवाळीत चिरीमिरीचा बाजार म्हटले, तर कुणी भुरट्या पत्रकारांचा पत्रकारितेला कलंक, दिवाळी भेटवस्तू आणि पाकिटासाठी लाचारी. अशाप्रकारे आपापले मनोगत लेखणीतून व्यक्त केले आहे. असे लेख वाचून हा लेख लिहिता झालोय.

या लेखाच्या माध्यमातून माझ्या गेल्या बारा वर्षांच्या मुक्तपत्रकारितेत आलेले अनुभव वाचकांसमोर शेअर करतोय ....! क्षेत्र कोणतेही असो त्यात काम करणारे व्यक्ती प्रामाणिक असले तर निश्चितपणे ते स्वतःचे नाव तर करतात. शिवाय त्यांच्याकडून समाजासाठी अनेक विधायक कार्य होतात. मात्र यासाठी अशा व्यक्तींच्या हृदयात व मनात एक प्रकारची तळमळ असावी लागते. अशी तळमळ असणारा व्यक्ती कधीही फक्त स्वतःपुरते पाहत नाही. तो एकावेळी आपल्या घरावर तुळशीपत्र ठेवतो परंतु समाजाचे प्रश्न मांडण्यासाठी व सोडविण्यासाठी पुढे येतो. भलेही त्याच्या सच्च्या व प्रामाणिकपणाची कुणी अवहेलना करो की हेटाळणी करो. याच्याशी त्याला काही एक देणे-घेणे नसते. त्याच्या मनात फक्त एवढेच असते की, आपण माणूस आहोत तर माणसांसारखे राहिले पाहिजे, वागले पाहिजे, इतरांच्या कामी आले पाहिजे. असा व्यक्ती कधीही स्वतःच्या फायद्यासाठी काहीही करत नाही आणि अशा व्यक्तीच्या चांगल्या व प्रामाणिक कार्याची जाणीव शासकीय-प्रशासकीय पातळीवर असो की, राजकीय नेते, कार्यकर्ते अथवा अधिकारी आणि कर्मचारी यांना नसते असे नाही. पण तरीसुद्धा अशा चांगल्या व्यक्तींना वर उल्लेख केलेली कुणीही मंडळी जवळ करत नाही किंवा त्याच्या अडीअडचणीत कामी येत नाही. कारण तो सत्य तेच दाखवीत असतो, लिहीत असतो. आणि नेहमी म्हटले जाते की सत्य हे कडू असते जो ते दाखवीतो तो सुद्धा चुकीच्या काम करणाऱ्यांच्या नजरेत नेहमी कडूच राहतो म्हणून अशा व्यक्तीपासून चुकीचे काम करणारे किंवा भ्रष्ट असणारे लोक लांबच राहण्याचा प्रयत्न करतात आणि चांगला, साधा, सोज्वळ, खरा व प्रामाणिक पत्रकार सुद्धा अशा लोकांच्या सावलीलाही उभा राहत नाही म्हणून अशा पत्रकारांच्या पाचवीला दारिद्र्य पूजल्यासारखे राहते.

काही लोकांनी पत्रकारितेसारख्या चांगल्या क्षेत्राला गेल्या काही वर्षात जणू काही बदनाम करण्याचा विडाच उचलल्याचे दिसून येते. खरे पत्रकार राहिले बाजूला परंतु बेकार पत्रकार मात्र दीपावली सारख्या सणाच्या निमित्ताने राजकीय नेत्यांपासून कार्यकर्त्यांपर्यंत आणि अधिकाऱ्यांपासून कर्मचाऱ्यांपर्यंत प्रत्येकाकडे खेटे मारून, त्यांचे उंबरे झिजवून, फुल न फुलाची पाकळी म्हणत सणवारासाठी जे शक्य होईल ते मिळविण्याचा केविलवाना प्रयत्न करत असल्याचे दिसते. जे खरे पत्रकार आहेत, ज्यांच्या खऱ्या लेखणीला मान व पाठीला आणि मानेला कणा आहे असे पत्रकार मात्र कधीही अशाप्रकारे कोणाच्या वळचणीला चुकूनही जात नाही. हे मी अगदी छातीठोकपणे नमूद करू इच्छितो. पत्रकारिता क्षेत्रात गेल्या बारा वर्षापासून लिखाण करीत आहे. एक तपाच्या कारकिर्दीमध्ये आजपर्यंत कोणत्याही राजकीय नेत्याने, कार्यकर्त्याने, अधिकाऱ्याने किंवा कर्मचाऱ्यांनी कधीही मला दिवाळी सणानिमित्ताने ना कधी बोलावले ना कधी एक रुपया दिला ना जाहिरात दिली तसेच सर्वात महत्त्वाच्या रमजान ईदला सुद्धा कधी कुणी ना एक रुपयाची जाहिरात दिली ना चिरीमिरी. मी मुक्तपत्रकार म्हणून लिखाण करीत असलो तरी या क्षेत्रातील अनेक संपादक, पत्रकार, संगणक तज्ञ, छपाई मशीन तज्ञ, छायाचित्रकार अशा सर्वांशीच चांगले जवळचे व मनस्वी स्नेही संबंध असल्याने या क्षेत्रातील बरीच माहिती झालेली आहे. म्हणूनच गेल्या बारा वर्षात कधीही कोणत्याही राजकीय नेत्याशी, कार्यकर्त्याशी, अधिकाऱ्यांशी किंवा कर्मचाऱ्यांशी जवळीक साधली नाही किंवा कधी कुणाच्या वळचणीलाही बांधला गेलो नाही. म्हणून ताठ मानेने लिहिता आले व येत आहे. जे बेकार पत्रकार आहेत ते लिखाणच करत नाही तर अशांना मान व पाठ ताठ ठेवण्याची गरजच लागत नसल्याने ते अशा प्रकारे नेते, कार्यकर्ते, अधिकारी, कर्मचारी यांच्याकडे लाचार होऊन नाही तर चोरावर मोर होत चिरीमिरीसाठी फिरतात. अशी जमात जरी अशा लोकांसमोर ते पत्रकार किंवा संपादक असल्याचे म्हणत असले तरी त्यांचा आणि पत्रकारिता क्षेत्राचा अर्थातच लोकशाहीच्या चौथ्या आधारस्तंभाचा खरे पाहता काही एक संबंध नसतो. तरीसुद्धा अशांच्या गळ्यात अडकवलेल्या ओळखपत्रांकडे पाहून जे नेते, कार्यकर्ते, अधिकारी आणि कर्मचारी अशांना सणानिमित्ताने असो किंवा इतर कारणाने जे काही आर्थिक लाभ देतात ते पत्रकार किंवा संपादक आहे म्हणून नव्हे तर ते पदावर असताना जे काही चुकीचे काम करतात त्याची आतील माहिती अशा वाटसरू बेकार पत्रकारांकडे असते आणि ते लिखाणा ऐवजी फक्त अशी आतील माहिती गोळा करूनच अशा लोकांकडे घिरट्या घालतात आणि वेळेवर त्यांना खिंडीत पकडून त्यांच्याकडून आर्थिक लाभ घेतात. असे भ्रष्ट लोक त्यांना आर्थिक दान करतात. ते फक्त त्यांनी केलेल्या चुकीच्या व भ्रष्ट कामांची जाहीर वाच्यता होऊ नये, समाजासमोर आपण उघडे-नागडे पडू नये, आपली नाचक्की होऊ नये, आपण पदावर असेपर्यंत सर्व काही आपल्या मनासारखे सुरळीत चालावे. याकरिता भ्रष्ट नेते, कार्यकर्ते, अधिकारी आणि कर्मचारी अशा भुरट्या पत्रकारांना सन-त्यौहाराच्या निमित्ताने चिरीमिरी देऊन स्वतःचे कातंड वाचविण्याचा प्रयत्न करतात. अशा बेकार पत्रकारांमुळे पत्रकारिता क्षेत्र खराब झाले किंवा चांगले सच्चे आणि प्रामाणिक पत्रकारांच्या कार्यावर ताशेरे ओढले जाऊ लागले, असा समज करून घेण्याची काही एक गरज नाही. कधी ना कधी दूध का दूध आणि पाणी का पाणी होतच असतो. आणि जर असं नाही झालं तर रामचंद्र कहे गये सिया से ऐसा कलजूग आयेगा, हंस चुगेगा दाना तुनका, कौआ मोती खायेगा हे वाक्य आठवावे. चांगले, सच्चे, खरे आणि प्रामाणिक संपादक तसेच पत्रकारांनीही अशा बाबी मनाला लावून घेऊ नये. कारण गेल्या बारा वर्षांपासूनचा माझा स्वानुभव पाहता मी हे छाती ठोकपणे सांगू शकतो की, सच्च्या व प्रामाणिक पत्रकारांना चिरीमिरी देण्याचे तर सोडा त्यांची ख्याली खुशाली सुद्धा कोणी विचारत नाही आणि तेही कोणाच्या दारी जात नाहीत. यामुळे ईद असो वा दीपावली त्यांच्यासाठी प्रत्येक दिवस सारखाच असतो हेही नक्की आणि तेवढेच खरे ....!

लेखन -
एस.एम.युसूफ़
(मुक्तपत्रकार)
आसेफ़नगर, बीड
संपर्क - ९०२१ ०२ ३१२१



## भाजपचे युवा नेते डॉ.धनराज पवार हे विडा पंचायत समिती निवडणुकीसाठी भाजपचे प्रबळ दावेदार!

केज (प्रतिनिधी):- केज तालुक्यातील विडा येथील एक कर्तृत्ववान आणि सर्वसामान्य कुटुंबातील युवक नेतृत्व, डॉ.धनराज पवार, हे आगामी विडा पंचायत समिती गणाच्या निवडणुकीसाठी भारतीय जनता पक्षाकडून (भाजप) एक प्रबळ आणि महत्त्वपूर्ण दावेदार म्हणून समोर येत आहेत. विशेष म्हणजे, महाराष्ट्र राज्याच्या मंत्री मा.पंकजाताई मुंडे, माजी खा.प्रितमताई मुंडे आणि केज-अंबाजोगाई मतदारसंघाचे ज्येष्ठ नेते नंदकिशोर(काकाजी) मुंदडा, केज मतदार संघाच्या कार्यसम्राट लोकाभिमुख आमदार नमिता ताई मुंदडा, युवक नेते अक्षय भैय्या मुंदडा यांचे निकटवर्तीय म्हणून डॉ.पवार यांची ओळख आहे, ज्यामुळे त्यांच्या उमेदवारीला अधिक बळ मिळत आहे.



सामाजिक कार्याचा प्रदीर्घ अनुभव आणि जनतेचा विश्वास:

डॉ.धनराज पवार यांचा प्रवास सर्वसामान्य शेतकरी कुटुंबातून सुरू झाला आहे. गेल्या पंधरा ते वीस वर्षांपासून ते सामाजिक आणि राजकीय कार्यात अत्यंत सक्रिय आहेत. त्यांची ही निष्ठा आणि सातत्य यामुळे सर्वसामान्य जनतेमध्ये त्यांच्याविषयी मोठा विश्वास आणि आदर आहे. ’लोकांच्या कामाचा माणूस’ म्हणून डॉ. पवार यांच्याकडे पाहिले जाते. विडा ग्रामपंचायतीतील यशस्वी कारकीर्द: सध्या ते विडा ग्रामपंचायतीचे सदस्य म्हणून कार्यरत आहेत. या पदावर असताना त्यांनी जनतेला न्याय मिळवून देण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न केले आहेत. त्यांच्या या कार्यकाळात त्यांनी ग्रामस्थांच्या सुख-दुःखात, अडी-अडचणीत कायमस्वरूपी सहभागी होऊन त्यांना आधार दिला आहे. यामुळे, आता पंचायत समितीच्या स्तरावर काम करण्याची त्यांची क्षमता आणि इच्छा जनतेला दिसत आहे.

जनतेतून आग्रही मागणी का?

डॉ.पवार यांनी आपल्या सामाजिक कार्यातून आणि ग्रामपंचायत सदस्यपदाच्या माध्यमातून जी विश्वासार्हता निर्माण केली आहे. त्यामुळेच विडा गणातील नागरिकांकडून त्यांना पंचायत समिती निवडणूक लढवण्याचा आग्रह केला जात आहे. पारदर्शक कार्यशैली: त्यांची पारदर्शक आणि लोकाभिमुख कार्यपद्धती. सुलभ उपलब्धता: सर्वसामान्यांसाठी ते कायम उपलब्ध असतात. युवा आणि ऊर्जावान नेतृत्व: एक युवा आणि उत्साही नेतृत्व पंचायत समितीमध्ये आवश्यक असल्याची जनतेची भावना. प्रबळ दावेदारी सिद्ध: भाजपकडून विडा गणासाठी अनेक इच्छुक उमेदवार असले तरी, डॉ. धनराज पवार यांची प्रदीर्घ सामाजिक कारकीर्द, ज्येष्ठ नेते नंदकिशोर (काकाजी) मुंदडा,आ.नमिताताई मुंदडा,अक्षय भैय्या मुंदडा यांचे निकटवर्तीय असणे, आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे जनतेतून होणारी आग्रही मागणी, या सर्व गोष्टींमुळे त्यांची दावेदारी इतर इच्छुकांच्या तुलनेत खूपच प्रबळ ठरत आहे. येत्या काळात भाजप पक्षश्रेष्ठी डॉ. पवार यांच्या उमेदवारीवर शिक्कामोर्तब करण्याची शक्यता असून, तसे झाल्यास विडा पंचायत समिती गणाची निवडणूक अत्यंत चुरशीची होणार यात शंका नाही. विडा गणातील जनतेचे लक्ष आता भाजपच्या अधिकृत घोषणेकडे लागले आहे.

## आत्मविश्वास असेल तर यश हमखास मिळतेच-महादेव किरवले

सिरसाळा (प्रतिनिधी): आत्मविश्वास आणि सातत्य व कठोर परिश्रम करण्याची तयारी असेल तर यश हमखास मिळतेच असे प्रतिपादन उपजिल्हाधिकारी महादेव किरवले यांनी केले.ते सिरसाळा येथे नालंदा अभ्यासिका यांच्या वतीने आयोजित कार्यक्रमात बोलत होते.



सिरसाळ्यातील नालंदा अभ्यासिका यांच्या वतीने स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी मार्गदर्शन सत्राचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान आयु. रामदादा किरवले यांनी भूषविले, तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपजिल्हाधिकारी आयु. महादेव किरवले उपस्थित होते.यावेळी पुढे बोलताना महादेव किरवले यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत, यश हे अचानक मिळत नाही; ते सातत्य, आत्मविश्वास आणि समाजासाठी काहीतरी करण्याच्या इच्छेतून जन्म घेतं, असा संदेश दिला. त्यांनी स्पर्धा परीक्षेची तयारी करताना अभ्यासाचा आराखडा, वेळेचे नियोजन आणि सातत्य या त्रिसूत्रीचे महत्त्व अधोरेखित केले.

तसेच त्यांनी पुढे सांगितले की, स्पर्धा परीक्षा ही केवळ नोकरी मिळवण्यासाठी नसून समाज परिवर्तनाचे प्रभावी साधन आहे. स्वाभिमान जपण्यासाठी व चांगला माणूस बनण्यासाठी शिक्षण घेतले पाहिजे, प्रशासकीय सेवांमधील प्रामाणिकता, जबाबदारी आणि समाजाशी जोडलेले राहण्याचे मूल्य त्यांनी विद्यार्थ्यांपुढे मांडले. यावेळी सुखदेव आरसुळे यांनी सादर केलेल्या भीम गीताने सभागृहात भावनिक आणि प्रेरणादायी वातावरण निर्माण केले. या गीताद्वारे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांची ऊर्जा विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवली.या प्रसंगी मंगलताई साहेबराव किरवले, अच्युत बप्पा किरवले, साहेबराव किरवले, दत्ता घडवे, शिंदे मामा, संतोष किरवले, संभाजी आरसुळे, निवृत्ती साळवे सुरेश उजगरे, लोखंडे, अजय किरवले, विजय किरवले, सागर किरवले, निकेश किरवले, रामेश्वर काटकर यांची मान्यवर उपस्थिती लाभली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. दयानंद झिंजुर्डे यांनी केले. त्यांनी विद्यार्थ्यांना सकारात्मकतेने अभ्यासात सातत्य ठेवण्याचे आणि स्पर्धात्मकतेकडे प्रामाणिक दृष्टीकोनाने पाहण्याचे आवाहन केले. सूत्रसंचालन ऋषिकेश गावडे यांनी केले, तर आयु. अमोल किरवले यांनी आभार प्रदर्शन करून सर्व उपस्थितांचे मनःपूर्वक आभार मानले. त्यांनी सांगितले की, नालंदा अभ्यासिकेचे उद्दिष्ट केवळ शैक्षणिक नाही, तर विद्यार्थ्यांना मानसिक व नैतिक बळ देणे हे आहे. कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांनी विविध प्रश्न विचारत प्रशासनातील कार्यपद्धती, आवश्यक पुस्तके आणि अभ्यासातील अडचणी यावर चर्चा केली. आयु. महादेव किरवले यांनी संयमी, वास्तववादी आणि प्रेरणादायी उत्तरांनी विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वृद्धिंगत केला. तसेच अशोक शिंदे व कुणाल कांबळे यांनी स्पर्धा परीक्षा प्रक्रियेविषयी माहिती दिली, तर प्रा. अमोल भीवराव किरवले यांनी खखढ व विज्ञान शाखेतील संधींवर मार्गदर्शन केले. या सत्राने सिरसाळा परिसरातील स्पर्धा परीक्षार्थ्यांमध्ये नवचैतन्य आणि नवउर्जा निर्माण केली. विद्यार्थ्यांनी प्रतिक्रिया देताना सांगितले की, हे सत्र आमच्या प्रवासातील दिशा देणारे ठरले. नालंदा अभ्यासिकेच्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत असून, अशा कार्यक्रमांमुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना योग्य दिशा, आत्मविश्वास आणि प्रेरणा मिळत आहे, असे मत उपस्थितांनी व्यक्त केले.

पान ४ वरून...

### दिवाळी मुहूर्तावर आडस येथील स्नेहमेळाव्यात अफाट गर्दीला संबोधताना शेतकरी हितासाठी व अठरापगड जातीच्या एकतेसाठी कार्य करत राहू - रमेश आडसकर

आहे. आता उर्वरित आयुष्य एकत्र काम करत शेतकऱ्यांना आर्थिक दृष्ट्या सक्षम करण्याचा प्रयत्न करू. राज किशोर पापा मोदी - स्व. आडसकर तात्यांच्या प्रेरणेतून आम्ही काम करतो आहोत. रमेशराव आणि ऋषी भैय्या तात्यांचा वारसा पुढे नेत आहेत. आम्ही त्यांच्या सोबत आहोत.

अंकुशराव अण्णा इंगळे (सभापती, कृ.उ.बा. समिती) -पूर्वीच्या निवडणुकांमध्ये आडसकरांनी इतरांना मदत केली, मात्र येणाऱ्या स्थानिक निवडणुकांमध्ये नागरिकांनी आडसकर कुटुंबाच्या पाठीशी खंबीरपणे उभं राहावं. डॉ. हारूणभाई इनामदार (नेते, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार) स्व. तात्यांनी पाया घातला आणि रमेशराव आडसकरांनी कळस चढवला. अठरापगड जातींच्या एकतेचा संदेश हा स्नेहमेळाव्याच्या निमित्ताने अधोरेखित होतो आहे. या प्रसंगी उपस्थित मान्यवर राजाभाऊ औताडे, नगराध्यक्षा डॉ. सौ. सिताताई बनसोड, राहुल भैय्या सोनवणे, हनुमंत मोरे, ईश्वर मुंडे, नगरसेवक राजू इनामदार, धनंजय देशमुख, माधव तात्या निर्मळ, बबन भैय्या लोमटे, किसन कदम, अमर भैय्या पाटील, अजहर इनामदार, कैलास पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. स्नेहमेळावा यशस्वी पणे पार पडल्यानंतर सर्व मान्यवरांनी रमेशराव आडसकर यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. दिवाळी फराळाचा आस्वाद घेऊन कार्यक्रम संपन्न झाला.

## पोहणेर जिल्ह्या परिषद गटांसाठी श्री.प्रभाकर तात्या पौळ यांच्या नावाचीच चर्चा सुरू-विकास राठोड

सिरसाळा (प्रतिनिधी):- जिल्ह्या परिषद व पंचायत समितीच्या सार्वत्रिक निवडणुका तब्बल आठ वर्षानंतर होत आहेत. कार्यकाळ संपुन तीन वर्षाचा कालावधी उलटून गेल्यानंतर अखेर या निवडणुकीची रणधुमाळी सुरू झाली आहे. दिनांक १३ ऑक्टोंबर रोजी पार पडलेल्या आरक्षण सोडत प्रक्रियेत जिल्हा परिषदेचा पोहनेर गट सर्वसाधारण साठी राखी उतरला आहे.



या गटातून अनेक उमेदवार इच्छुक असली तरी निष्ठावंत कार्यकर्ते श्री.प्रभाकर तात्या पौळ यांचे नाव जिल्ह्या परिषदेसाठी प्रबळ दावेदार म्हणून चर्चेत आले आहे.सध्या सर्व पक्षांतर्गत इच्छुक उमेदवार तिकीटासाठी आपल्या वरिष्ठांकडे जोरदार प्रयत्न करत असताना पोहनेर जिल्ह्या परिषद गटात श्री.प्रभाकर तात्या पौळ यांचे नाव जनतेमधून व आठरापगड जाती मधुन ठळकपणे पुढे येत आहे.

पौळ यांनी सरकारी साखर कारखान्याचे ते संचालक राहिले आहे.तसेच ते कासारवाडी रामेवाडी या गावचे सरपंच देखिल राहिले होते. व त्यानी त्याकाळात गोरगरीबांना घरकुल असो कि शासनाचे कुठले काम रोकु दिले नाही असी त्याची ओळख निर्माण केली आहे.

लोकप्रियतेच खरं. गमक. मानल. जाते. राजकारण. आणि समाजकारण. या दोन्ही क्षेत्रात त्यांनी नेहमीच सक्रिय सहभाग नोंदवला आहे. त्यांच्या नेतृत्व गुणामुळे व जनसंपर्कमुळे उमेदवार सहज विजय होईल असा विश्वास स्थानिक कार्यकर्त्यांमध्ये व्यक्त होत आहे.पोहणेर जिल्ह्या परिषद गटा मधुन भरभरून विजय होतील असा विश्वास गोर बंजारा समाजिक संघटनेचे युवा नेतृत्व विकास राठोड यांनी असे आव्हान केले आहे.ते निश्चितच संधीचे सोने करून पोहनेर गटाचा सर्वांगीण विकास साधतील.अशी अपेक्षा व विकास राठोड यानी व जनतेतून व्यक्त होत आहे.


# दिवाळी सण संपला तरी; टाकरवन मधील दलित वस्ती अंधारात

## ग्रामपंचायत कडून जाणीवपूर्वक दुर्लक्ष; दलित वस्तीतील नागरिकांचा आरोप

टाकरवन (प्रतिनिधी):- टाकरवन येथे दिवाळी सणानिमित्त दरवर्षी गावामध्ये ग्रामपंचायत विद्युत खांबावर पथदिवे बसवण्यात येत आहे. मात्र यावर्षी दिवाळी सणानिमित्त ग्रामपंचायत ने खांबावर पद दिवे बसवण्याचे काम हाती घेतले परंतु दलित वस्ती कडे त्यांनी दुर्लक्ष केल्याचं पाहण्यास मिळत असून, दिवाळी सण संपला तरी दत्तनगर,गणेशनगर वार्ड क्रमांक चार दलित वस्ती मध्ये पथदिवे बसवले नसल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. यामुळे दलित वस्तीतील नागरिकांतून ग्रामपंचायत विषय संताप व्यक्त केला जात आहे. वार्ड क्रमांक चार मध्ये बहुसंख्य दलित आहेत. या वार्डात विद्युत खांब आहेत. खांबावरील जुने पथदिवे बंद पडल्यामुळे तसंच दिवाळी सणानिमित्त ग्रामपंचायत कडून दरवर्षी नवीन पद्धतीवे बसवले जाते. यावर्षी दिवाळी सण संपला तरी ग्रामपंचायत ने दलित वस्तीत अद्याप पथदिवे बसवल्या नसल्यामुळे दलित समाजातील नागरिकांचा फक्त ग्रामपंचायत कडून मतापुरताच वापर केला जात असल्याचा आरोप देखील आता येथील नागरिकांतून केला जात असून यापुढे मतदान मागायला या मग आम्ही तुम्हाला सांगू अशा प्रकारचे वक्तव्य देखील केले जात आहे. निवडणुका जवळ आले की नुसते आश्वासन देऊन गायब होतात. ग्रामपंचायत कडून कुठलीच मूलभूत सुविधा वेळेवर दलित वस्तीमध्ये दिले जात नाही. यातच गावातील इतर वार्डमध्ये महिनाभरा पासून पथदिवे बसवण्याचं काम ग्रामपंचायतने हाती घेतले मात्र ग्रामपंचायत ने जाणीवपूर्वक दलित वस्ती कडे दुर्लक्ष केले असल्यामुळे आज दिवाळी सणात दलित वस्तीवरील प्रकाश मायाचा दिवा अंधारात असल्याचे पाहण्यास मिळत आहे. दलित वस्तीत पथदिवे बसवले नुसतं कागदावर दाखवून ग्रामपंचायत पैसे हडप करणार नाही ना असा देखील सवाल येथील नागरिकांतून उपस्थित केला जात आहे.

र्ड क्रमांक एक वार्ड क्रमांक दोन वार्ड क्रमांक तीन वार्ड क्रमांक पाच मध्ये पथदिवे बसविलेले आहेत.

परंतु वार्ड क्रमांक चार जाणीवपूर्वक दुर्लक्षित ठेवलेला आहे ग्रामपंचायतने. वार्ड क्रमांक चार मध्ये दलित बहुसंख्येने असल्यामुळे वंचित ठेवला आहे का? असा प्रश्न निर्माण होत आहे!



# शिरूर कासार तालुक्यातील जाटनांदूर ग्रुप ग्रामपंचायत मधील पूरग्रस्त, गरीब गरजूंना साहित्यांचे वाटप

## प्रवरा मेडिकल ट्रस्ट, तालुकाप्रमुख सोपान मोरे (काका) चा पुढाकार

शिरुर कासार (प्रतिनिधि) : मागील पंधरावाड्यात ढगफूटीसदृष्य मुसळधार पावसामुळे नदी-नाल्यांच्या महापुराने शिरुर कासार तालुक्यातील जाटनांदूरसह परिसरातील शेतजमीन पिकांसह खरडून गेली.

हाता-तोंडाशी आलेला खरिपाचा घास हिरावल्याने संकटाशी दोन हात करणार्या हतबल शेतकरी-शेतमजुर, गरीब,गरजूंना दिवाळी सनासाठी प्रवरा मेडिकल ट्रस्ट यांच्या सहकार्याने शिवसेना (उबाठा) चे तालुका प्रमुख सोपान (काका) मोरे यांच्या पुढाकाराने अवश्यक किराणा साहित्यांसह उबदार कपड्याचे किट वाटप करण्यात आले. दिवाळीत आधार



मिळाल्याचे समाधान होत असून सोपान (काका) मोरे यांच्या माध्यमातून दिवाळी गोड होणार असल्याच्या भावना व्यक्त करण्यात आल्या. महापूराने संसार उघड्यावर आला, पिकांसह शेती खरडून गेली. दावनीचे जनावर वाहून गेली अशा एक ना आनेक संकटात बुडालेला शेतकरी, शेतमजुरांसमोर जगण्यासाठी डोंगराएवढे संकट आहे. त्यातच दिवाळी सणाचा उत्साहावर जणू वेदणांच विर्जन पडलं असावं!. त्यातच दिवाळीच्या तेजोमय प्रकाशाने संकटाचा अंधार दूर होईल का? या आशेवर असलेल्या जाटनांदूर गणातील गावखेड्यांसह वाडी वस्ती तांड्यावरील शेतकरी, शेतमजूरांसाठी धावून आले ते शिवसेना (उबाठा) तालुकाप्रमुख सोपान (काका) मोरे. प्रवरा मेडिकल ट्रस्ट यांच्या पुढाकराने तालुका प्रमुख सोपान (काका) मोरे यांनी अथक परिश्रम करून जाटनांदूर ग्रूप ग्रामपंचायत, जेधेवाडी, भिलारवाडी, मुळीकवाडी, मोरजळवाडी, सवसवाडी, वडाळी, उखळवाडी, चाहूरवाडीतील गरीब गरजूंना थेट घरपोहोच किराणा साहित्यांसह उबदार कपड्यांच्या किटा वाटप केल्या. ऐन दिवाळीत आवश्यक साहित्यांचा आधार मिळाल्याने समाधान व्यक्त करत सोपान (काका) मोरे यांच्या रुपाने दूतमिळाल्याच्या भावना यावेळी नागरिकांनी व्यक्त केल्या.

### महापुरुषांचे आशीर्वाद घेऊन बाबा कांबळे यांचा एल्गार...

# तेलगाव जि.प.गटातून निवडणूक लढवण्याची मागणी

दिंद्रुड (प्रतिनिधी):- येथून जवळच असलेल्या श्री क्षेत्र देव दहिफळे येथे मातंग समाजाची भव्य निर्धार बैठक पार पडली. यामध्ये तेलगाव जिल्हा परिषद गटातून युवा नेते बाबा कांबळेख यांनी निवडणूक लढवावी अशी मागणी सर्वानुमते करण्यात आली. शेतकरी, कष्टकरी, ऊसतोड कामगार व डोंगरपट्ट्यातील सामान्य लोकांचे प्रश्न सोडवण्यासाठी आपण ही निवडणूक लढवू आणि जिंकू सुद्धा असा एल्गार बाबा कांबळे यांनी महापुरुषांचे आशीर्वाद घेऊन केला. यावेळी सर्कलमधील कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



सामाजिक चळवळीतील निष्ठावंत कार्यकर्ता म्हणून बाबा कांबळे जिल्हाभरात सुप्रसिद्ध आहेत. छत्रपती शिवाजी महाराज, लहुजी वस्ताद साळवे, महात्मा ज्योतिबा फुले, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, साहित्यरत्न डॉ. अण्णाभाऊ साठे आदी महापुरुषांचे विचार केवळ बोलण्या पुरतेच नाही तर ते आचरणात आणून सामाजिक सलोखा व बंधुभाव कायम राहिला पाहिजे यासाठी कांबळे प्रयत्नशील असतात. नुकतीच धारूर तालुक्यातील देवदहिफळ येथे मातंग समाजाची व्यापक निर्धार बैठक पार पडली. यामध्ये सर्वांनी बाबा कांबळे यांनी तेलगाव जि.प. गटातून निवडणूक लढवावी अशी जोरदार मागणी केली. बाबा कांबळे यांचे संघटन व समाजातील उपेक्षित घटकांसाठी काम करण्याची तळमळ सर्वश्रुत आहे. सर्व जाती धर्माच्या लोकांना सोबत घेऊन काम करणारा कांबळे हा अजातशत्रू कार्यकर्ता आहे. तेलगाव जिल्हा परिषद गट हा अनुसूचित जातीच्या महिलासाठी आरक्षित असल्यामुळे कांबळे यांच्या सुविद्य पत्नी सौ. पूजा कांबळे यांची उमेदवारी प्रबळ समजली जाते. त्यांची उमेदवारी विजयाच्या दृष्टिकोनातून परिणामकारक राहील अशी चर्चा मतदार संघात आहे. त्यांची उमेदवारी सर्व दृष्टिकोनातून सक्षम असल्यामुळे त्यांनी निवडणूक लढवावी अशी मागणी सदरील बैठकीत करण्यात आली.

### कुणाच्या दबावाखाली नाही तर गावाच्या विकासासाठी माझा राष्ट्रवादीत प्रवेश-उपसरपंच तळतकर

# उपसरपंच तुकाराम तळतकर आपल्या असंख्य कार्यकर्त्यांसह राष्ट्रवादीत दाखल

गेवराई (प्रतिनिधी):- सत्ता असो नसो शिवछत्र परिवार कायम शेतकरी आणि सर्वसामान्य नागरिकांसाठी काम करत आला आहे,आता तर सत्ता आपली आहे. शेतकऱ्यांच्या कोणत्याही योजना आपल्या पर्यंत घेऊन येण्यासाठी आ. विजयसिंह पंडित यांच्या माध्यमातून प्रयत्न केले जातील. उपसरपंच तुकाराम तळतकर यांनी बंगाली पिंपळा गावात केलेल्या कामामुळे जनतेचा विश्वास त्यांच्यावर वाढला आहे. त्यांना बळ देऊन शासकीय योजनांना गती देण्याचे काम केले जाईल असे प्रतिपादन अमरसिंह पंडित यांनी तर आमचे नेते अमरसिंह पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली शासकीय योजनांचा लाभ सामान्य नागरिकांना मिळवून देणार असल्याचे सांगून कुणाच्या दबावाखाली नाही तर बंगाली पिंपळा गावच्या विकासासाठी आपण शिवछत्र परिवारात सहभागी होऊन राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश करत असल्याचे उपसरपंच तुकाराम तळतकर यांनी सांगितले.



गेवराई विधानसभा मतदारसंघातील मौजे बंगाली पिंपळा गावचे उपसरपंच तुकाराम तळतकर यांच्या नेतृत्वाखाली ग्रामपंचायतीचे सरपंच, सदस्य आणि त्यांच्य असंख्य सहकार्यांनी गुरुवार दिनांक २३ ऑक्टोबर रोजी जयभवानी सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अमरसिंह पंडित यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादीत जाहीर प्रवेश केला. यावेळी झालेल्या कार्यक्रमाला जयभवानी सहकारी साखर कारखान्याचे उपाध्यक्ष भाऊसाहेब नाटकर, सभापती जगन्नाथ काळे, सरपंच परिषदेचे तालुकाध्यक्ष कालिदास नवले, डॉ.विजयकुमार घाडगे, विश्वनाथ सोनवणे, बळीराम रसाळ, पवन चव्हाण, विकास सानप, संदीपान दातखीळ, राजेंद्र कदम, सचिन ढाकणे, गणपत राठोड, परमेश्वर खरात, ईस्माईल भाई, बळीराम रसाळ, विश्वनाथ सोनवणे, युवराज जाधव, दिपक बोर्डे, पवन चव्हाण, प्रशांत लांडे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. बंगाली पिंपळा येथील उपसरपंच तुकाराम तळतकर यांच्यासह सरपंच बाळासाहेब गायकवाड, चेअरमन बाबासाहेब भुईभार, व्हाईस चेअरमन रावसाहेब दातार, राजाराम गरवडे, बळीराम चौधरी, शिवाजी भिलगुडे, अजगरअली जहागिरदार, नारायण गोलार, दिलसुक चौधरी, संतराम शिंदे, नाथजी सोलनकर, पंढरीनाथ जाधव, मिठू राठोड, विठ्ठल गोटाधर, विठ्ठल गायकवाड, लियाकत अली उस्मान यांच्यासह असंख्य कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादीत जाहीर प्रवेश करुन अमरसिंह पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली आणि आ. विजयसिंह पंडित यांच्या नेतृत्वाखाली येणाऱ्या जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीत निष्ठेने काम करण्याचा निर्धार केला. यावेळी बोलताना अमरसिंह पंडित पुढे म्हणाले की, बंगाली पिंपळा येथील उपसरपंच तुकाराम तळतकर यांच्यासह सामान्य कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादीत प्रवेश केला याचा मला आनंद आहे. या कार्यकर्त्यांच्या माध्यमातून बंगाली पिंपळा येथे शासकीय योजनांना गती देण्याचे काम केले जाईल.एक वर्षात या भागातील बंधाऱ्याचे काम स्वतः जातीने लक्ष ठेवून पुर्ण केले जाईल.

# माजी.आ.भीमराव धोंडे साहेब जो उमेदवार देतील तो मान्य-युवराज खटके



आष्टी (प्रतिनिधी):- आष्टी तालुक्यात जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीचे वारे वाहू लागले आहेत.लोणी.स जिल्हा परिषद गट हा यंदा सर्वसाधारण महिला प्रवर्गासाठी असून, लोणी.स पंचायत समिती गण हा ओ.बी.सी. महिलांसाठी आरक्षित आहे.या पार्श्वभूमीवर युवा नेते मा.डॉ.अजय धोंडे यांचे विश्वासू सहकारी युवा कार्यकर्ते.मा.युवराज खटके यांनी प्रतिनिधींशी बोलताना सांगितले की,मा.आ.भिमराव धोंडे साहेब जो उमेदवार देतील तो निर्णय आम्हा सर्वांना मान्य असेल.मा.आ.भिमराव धोंडे यांच्या मार्गदर्शनाखालीच या निवडणुकीला सामोरे जाण्याचा माझा निर्णय आहे.तन,मन,धनाने त्यांनी जो उमेदवार देतील त्याचा प्रचारात सहभागी होत निवडणूक यशस्वी करून दाखवू.युवा नेते डॉ.अजय दादा धोंडे यांचे विश्वासू सहकारी युवा कार्यकर्ते.युवराज खटके म्हणाले,गेल्या अनेक वर्षांपासून मी राजकारणात व समाजकारणात सक्रिय आहे.शासकीय कामकाजात नागरिकांना येणाऱ्या अडचणी सोडवण्यासाठी मी नेहमी तत्पर राहिलो आहे.सर्वसामान्यांच्या सुख-दुःखात सहभागी होत त्यांच्या मदतीसाठी प्रयत्नशील राहीलो आहे.येणाऱ्या काळात तरुण व उच्चशिक्षित उमेदवार म्हणून मी निवडणुकीसाठी तयारी करत आहे.मा.आ.भिमराव धोंडे साहेबांच्या मार्गदर्शनाखाली मी काम करत राहणार असून त्यांच्या निर्णयाला माझा पूर्ण पाठिंबा राहील,असे युवा कार्यकर्ते.मा.युवराज खटके यांनी स्पष्ट केले आहे.

# केज शहरामध्ये अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत अनिल क्लिनिकल लॅबचे उद्घाटन संपन्न

केज (प्रतिनिधी):- दि.२१/१०/२०१५ रोजी मौजे कोरेगांवचे सुपुत्र गणेश नारायण तांदळे व अश्विनी अनिल बडे यांनी ह.भ.प. आचार्य अर्जुन महाराज लाड व ह.भ.प. प्रल्हाद महाराज शास्त्री ढाकणे यांच्या शुभाशीर्वादने अनिल हॉटेलच्या शेजारी, बीड रोड केज येथे अनिल क्लिनिकल लॅबचे उद्घाटन झाले आहे. जिथे रुग्णाच्या रक्त, मूत्र, मल, थुंकी, पेशी, ऊतक इ. नमुन्यांवर वैज्ञानिक तपासण्या केल्या जातील. या तपासण्यांमुळे रुग्णाच्या शरीरातील आजारांचे निदान, उपचाराचे नियोजन आणि आरोग्यस्थितीचे निरीक्षण करता येईल. क्लिनिकल लॅब हे आधुनिक वैद्यकशास्त्रातील अत्यंत महत्त्वाचे केंद्र असल्यामुळे रुग्णाचे आजार निदान, उपचार, व प्रतिबंध या सर्व प्रक्रियांमध्ये अशा लॅबची निर्णायक भूमिका असते. सदरील उद्घाटन प्रसंगी कोरेगावचे समस्त गावकरी मंडळी हे उपस्थित होते.



सामाजिक कार्यकर्ते मा.नंदकुमार मुंदडा, शिवसेना जिल्हाप्रमुख मा.रत्नाकर आप्पा शिंदे, माझी सभापती विष्णुभाऊ घुले, त्याचप्रमाणे कोरेगांवचे विद्यमान सरपंच श्री दत्ता किसन नागरगोजे, माझी सरपंच बालाजी तांदळे, डॉ.अजित तांदळे, ड.वसंत तांदळे, ड.कैलास घुले, डॉ. डी.तांदळे, डॉ.गोरख तांदळे, डॉ.दिलीप चालक, डॉ.ब्रह्म डोईफोडे, डॉ.अस्वले, डॉ.कैलास मुंडे, डॉ.योगिनी थोरात, डॉ.पांडुरंग तांदळे, डॉ.योगेश्वरी थोरात, डॉ.रमाकांत नेहरकर, डॉ.टोपे, डॉ.वायबसे, डॉ.कुटे, डॉ.मिसाळ, डॉ.मुलाणी, डॉ.डापकर, इत्यादी मान्यवरांनी उपस्थिती दर्शविली होती.



# पत्रकार कासम शेख यांच्या लेकरांची दिवाळी गोड व्हावी - सरपंच सचिन दळवी व मित्र परिवाराकडून दिवाळी किराणा किट भेट

**दौलवडगाव : ऐन सणासुदीच्या काळात पत्रकार कासम शेख यांच्या घरावर प्रशासनाकडून करण्यात आलेल्या बेकायदेशीर बुलडोजर कारवाईमुळे त्यांच्या कुटुंबावर अंधार पसरला होता. या दुःखद प्रसंगानंतर त्यांच्या लेकरांची दिवाळी गोड व्हावी, त्यांच्या चेहऱ्यावर पुन्हा हास्य फुलावे, या हेतूने केळ ता. आष्टी येथील विद्यमान सरपंच श्री. सचिन सुदाम दळवी आणि त्यांचा मित्र परिवार यांनी सामाजिक बांधिलकी जपत एक हृदयस्पर्शी उपक्रम राबवला. सरपंच श्री. दळवी व मित्र परिवार यांनी पत्रकार कासम शेख यांच्या घरी जाऊन त्यांना दिवाळी किराणा किट भेट दिली. या किटमध्ये दिवाळी सणासाठी लागणाऱ्या सर्व आवश्यक वस्तू तांदूळ, साखर, तेल, मसाले, मिठाई साहित्याचा समावेश करण्यात आला होता. या प्रसंगी बोलताना श्री. दळवी म्हणाले,पत्रकार समाजाचे आरसे असतात. त्यांच्या घरावर अन्याय झाला असला तरी समाज म्हणून त्यांच्या पाठीशी उभं राहणं ही आपली जबाबदारी आहे. त्यांच्या लेकरांच्या चेहऱ्यावर आनंद फुलावा, हाच आमचा उद्देश आहे.**

# बलिप्रतिपदा निमित्ताने महात्मा बळीराजाला अभिवादन ईडा पिडा टळो, बळीचे राज्य येवो घोषणाबाजी, सोयाबीन हमीभाव केंद्रे तातडीने सुरू करण्यात यावी,अतिवृष्टीमुळे नुकसान ग्रस्त शेतकऱ्यांना भरीव मदतीची मागणी-डॉ. ढवळे



लिंबागणेश (प्रतिनिधी):- अतिवृष्टीमुळे बीड जिल्ह्यातील ७ लाख २१ हजार हेक्टरवरील पिकांचे पुर्ण नुकसान होऊन ८ लाख ५७ हजार शेतकऱ्यांना या नैसर्गिक आपत्तीचा फटका बसला आहे. शिवारातील सोयाबीन, कपाशी, तूर यांसह अनेक पिके पाण्याखाली गेली आहेत. नदीनाल्यांच्या पुरामुळे शेतीबरोबरच जनावरे व शेतीतील साहित्य वाहून गेले असून शेतकरी आर्थिकदृष्ट्या कोलमडला आहे.

सरकारने पंचनामे करून दिवाळीपूर्वी अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांच्या खात्यावर मदत जमा केली जाईल आणि दिवाळी गोड करण्यात येईल असे आश्वासन दिले होते. मात्र ही घोषणा फक्त कागदावरच राहिली. राज्यात दिवाळीचा प्रकाश साजरा होत असताना शेतकऱ्यांच्या घरात मात्र अजूनही निराशेचे वातावरण आहे.

या पार्श्वभूमीवर दि.२२ बलिप्रतिपदेच्या दिवशी लिंबागणेश येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली शेतकरी हक्कासाठी निदर्शने करण्यात आली. यावेळी प्रजाहितदक्ष, शेतकऱ्यांचा लोककल्याणकारी दानशूर राजा महासम्राट बळीराजा यांच्या प्रतिमेचे पूजन करून सरकारच्या शेतकरीविरोधी धोरणांचा निषेध व्यक्त करण्यात आला. डॉ. ढवळे म्हणाले, ज्याप्रमाणे वामनाने कपटाने बळीराजाला पाताळात घातले, त्याचप्रमाणे आजचे सरकार आपल्या धोरणांद्वारे शेतकऱ्यांना आर्थिक पाताळात ढकलत आहे.



**बीड:- आज टाईम्स ऑफ इंडिया महाराष्ट्राचे ब्युरो ऑफ चीफ सय्यद रिजवान उल्ला हे आज बीड येथे आले असता त्यांच्या हस्ते एका कार्यक्रमात सामाजिक व विविध क्षेत्रात विशेष व उल्लेखनीय काम केल्याबद्दल सामाजिक कार्यकर्ते मुसाखान पठाण यांचा सत्कार करताना टाइम्स ऑफ इंडियाचे महाराष्ट्राचे ब्युरो ऑफ चीफ सय्यद रिजवान उल्ला हे दिसत आहेत.**

# दिवाळी मुहूर्तावर आडस येथील स्नेहमेळाव्यात अफाट गर्दीला संबोधताना शेतकरी हितासाठी व अठरापगड जातीच्या एकतेसाठी कार्य करत राहू - रमेश आडसकर



केज (प्रतिनिधी):- अतिवृष्टीमुळे झालेल्या शेतकऱ्यांच्या नुकसानाची दखल घेत शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी व त्यांच्या हितासाठी प्रामाणिकपणे कार्य करत आहोत, असे मत ज्येष्ठ नेते तथा अंबा सहकारी साखर कारखान्याचे चे अरमन रमेशराव आडसकर यांनी व्यक्त केले. पारंपरिक सामाजिक सलोखा जपण्यासाठी व अठरापगड जातींना एकत्र घेऊन जाण्याचा वारसा पुढे नेण्यासाठी दीपावली पाडवा निमित्त आयोजित स्नेहमेळाव्यात विविध राजकीय व सामाजिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

रमेशराव आडसकर म्हणाले की, जग पुढे जात असताना आपण आपल्या मुळाशी जोडलेले राहिले पाहिजे. स्व.आ.आडसकर तात्यांनी सुरू केलेली अठरापगड जातींच्या ऐक्याची परंपरा आम्ही जपतो आहोत. समाजकारण आणि राजकारणाच्या माध्यमातून सर्वसामान्य जनतेच्या सेवेत सदैव कार्यरत राहू.त्यांनी पुढे सांगितले की, जातीय तणाव दूर ठेवण्यासाठी सर्व युवकांनी एकत्र येऊन काम करणे गरजेचे आहे. येणारा काळ हा शेतकरी, कामगार, कष्टकरी व सर्वसामान्य जनतेसाठी भरभराटीचा जावो, हीच शुभेच्छा. प्रमुख मान्यवरांचे विचार संजय आबा दौंड (माजी आमदार) - आडसकर हे नाव जिल्ह्यात विश्वासाचं प्रतीक आहे. रमेशराव आडसकर हे भविष्यात आमदार होतील, याचा विश्वास आहे. जनतेचा आशीर्वाद त्यांच्या पाठीशी आहे. ह्वराजेश्वर चव्हाण (जि.अ.रा.कॉ.) -आडसकर परिवाराने समाजाशी जिव्हाळ्याचं नातं जपलं आहे. रमेशराव आडसकर यांचे राजकीय भविष्य उज्ज्वल आहे. दत्ता आबा पाटील (उपाध्यक्ष, अंबा साखर कारखाना) -आडसकर-पाटील वैर संपले पान २ वर...




# पोहणेर पंचायत समिती निवडणुकीत जनतेच्या मनातला हक्काचा माणूस श्री शरद राठोड यांच्याच उमेदवारीची चर्चा



सिरसाळा (प्रतिनिधी):- परळी तालुक्यातील पंचायत समिती सदस्य पदासाठी आरक्षण जाहीर होताच पोहणेर परिसरात राजकीय हालचालींना वेग आला आहे. पोहणेर पंचायत समिती सदस्य पदासाठी ओबीसी सर्वसाधारण आरक्षण घोषित झाल्याने स्थानिकांमध्ये उमेदवार ठरविण्याबाबत चर्चा रंगल्या आहेत.या चर्चांदरम्यान ग्रामस्थांनी एकमुखाने मागणी केली आहे की,२०१२पासून धनंजय मुंडे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली निस्वार्थपणे कार्यरत असलेले, सर्वसामान्य माणसाच्या मदतीला नेहमी धावून जाणारे कार्यकर्ते शरद राठोड यांनाच या गणातून उमेदवारी द्यावी. गेल्या अनेक वर्षांपासून शरद राठोड यांनी गावातील सामाजिक, शैक्षणिक, तसेच सार्वजनिक प्रश्नांवर सातत्याने पाठपुरावा करत सामान्य जनतेचा विश्वास संपादन केला आहे. कोणत्याही स्वार्थाशिवाय त्यांनी फक्त जनसेवा हेच ध्येय ठेवून कार्य केले असून, गरीब-शेतकरी वर्गासाठी ते नेहमीच उपलब्ध राहिले आहेत. ग्रामस्थांचे म्हणणे आहे की,शरद राठोड. यांनी पक्ष निष्ठा, शिस्त आणि सेवाभाव यांचा आदर्श

घालून दिला आहे. गावाच्या विकासासाठी त्यांनी नेहमी पुढाकार घेतला. आज पर्यंत त्यांनी कोणतेही पदाचा लाभ घेतला नाहीं आता पक्षाने त्यांच्या कार्याची दखल घेऊन त्यांना अधिकृत उमेदवारी द्यावी. पोहणेर गणातील ग्रामस्थ, कार्यकर्ते आणि युवकांनी निर्धार केला असुन शरद राठोड यांनाच पोहणेर पंचायत समिती सदस्य पदाची उमेदवारी द्यावी, अशी मागणी जोर धरत आहे. या मागणीमुळे पोहणेर व परिसरातील राजकीय वातावरण चांगलेच तापले असून, पक्षाची भूमिका काय राहणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.



बीड : आंतरवाली सराटी येथे संघर्षयोध्दा मनोज जरांगे पाटील यांची भेट घेऊन दिवाळी पाडव्यानिमित्त नेकनुरचे उपसरपंच सचिन शिंदे यांनी शुभेच्छा दिल्या.यावेळी मराठा सेवक जगन्नाथ घोडके, रौफ भाई व इतर मान्यवर उपस्थित होते.










हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT